# प्रसिद्धी निवेदन

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) 2017-18 इ. 8 वी दि. 03 डिसेंबर 2017 ची गुणयादीबाबत

सन 2007-08 पासून इ. 8 वी तील नियमित आणि आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना ही मिनिस्ट्री ऑफ हयुमन रिसोर्सेस भारत सरकार (M.H.R.D.) नवी दिल्ली यांचे मार्फत राबविली जात आहे. आर्थिक मागास विद्यार्थ्यांमधून प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या प्रज्ञेची जोपासना, तसेच त्यांचे 12 वी पर्यंत शिक्षण सुलभतेने पूर्ण व्हावे हा या योजनेचा गाभा आहे. प्रज्ञावान विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्तीच्या स्वरुपात आर्थिक मदत करण्यात येते.

सदर शिष्यवृत्ती 12 वी पर्यंत मिळते. सन 2017-18 पासून शिष्यवृत्तीचा दर दरमहा रु. 1,000/- आहे (वार्षिक रु. 12,000/-).

इ. 8 वी तील आर्थिक दुर्बल घटकातील ज्या पालकांचे उत्पन्न रु. 1,50,000/- पेक्षा कमी आहे व **महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासनमान्य अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेतील इयत्ता 8 वी मध्ये शिकत असलेल्या आणि नियमित विद्यार्थी / विद्यार्थीनीस या परीक्षेस बसता येते. विनाअनुदानित शाळा, केंद्रीय विद्यालय, जवाहर नवोदय विद्यालयात शिकणारे विद्यार्थी तसेच शासकीय वसतीगृहाच्या सवलतीचा लाभ घेऊन शासकीय किंवा खाजगी शाळेत शिकणारे विद्यार्थी या परीक्षेसाठी अपात्र आहेत.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत 03 डिसेंबर 2017 रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) 2017-18 इ. 8 वीच्या विद्यार्थ्यांची प्राप्त गुणांची यादी **शनिवार दिनांक 19/05/2018 रोजी दुपारी 3.00 वाजता** जाहीर होणार आहे.

NMMS इ. 8 वी परीक्षेसाठी 79392 विद्यार्थी नोंदविण्यात आले. NMMS परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यातून परीक्षेमधून 11682 विद्यार्थी कोटा M.H.R.D. नवी दिल्ली यांचेकडून निश्चित केला आहे. महाराष्ट्र राज्याच्या आरक्षणानुसार संबंधित संवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. तसेच संबंधित संवर्गात दिव्यांगत्वासाठी (अपंगासाठी)3% आरक्षण समाविष्ट आहे. सर्व जिल्हयांसाठी स्वतंत्रपणे इ. 7 वी व इ. 8 वी ची विद्यार्थी संख्या व 12 ते 14 वयोगटातील संख्या यांच्या आधारे जिल्हानिहाय कोटा निश्चित करण्यात येतो. ही प्राप्त गुणांची यादी **महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in** व **www.nmms.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर शनिवार दिनांक 19/05/2018 रोजी दुपारी 3.00 वाजल्यापासून पाहता येईल.**

विद्यार्थ्यांना/पालकांना शाळेमार्फत जात, अपंगत्व, जन्म दिनांक इ. बाबतची दुरुस्ती असल्यास तसेच निकालबाबत काही दुरुस्ती असल्यास ती दि. 25.05.2018 पर्यंत परिषदेकडे nmms.msce@gmail.com या ईमेलवर पाठवता येईल. सदर तारखेनंतर येणाऱ्या अर्जांचा/दुरुस्त्यांचा विचार केला जाणार नाही. प्राप्त सर्व दुरुस्त्यांचा विचार करुन शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची निवडयादी परिषदेच्या **www.mscepune.in** व **www.nmms.mscescholarshipexam.in** या संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल.

(सुखदेव डेरे)
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-1.

E:\NEW 2012\NTS+NMMS 2017-18\NMMS Result\Pressnote Provisional result .docx